पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड, पुणे- ३८

# मराठी विभाग

## वार्षिक अहवाल

२०२२ -२०२३

**सन २०२१ – २२ या वर्षाचे टक्के निकाल खालील प्रमाणे**

एफ.वाय. बी.ए- ९३.१० %, एस. वाय .बी.ए -७६.४७ %

टी. वाय.बी.ए -८०.२५ % एम.ए . II- १००%

अशा प्रकारे मराठी विभागाचे निकाल उत्तम लागले.

२०२२ -२०२३ या शै.वर्षामध्ये प्रथम आलेले विद्यार्थी व विभागाने विविध घेतेले उपक्रम खालील प्रमाणे

**१) वर्गात प्रथम आलेले विद्यार्थी**

| | |
|---|---|
| १. डफल तेजस श्रीपती | S.Y.B.A |
| २. कांबळे सुमित बाळासाहेब | T.Y.B.A |
| ३. दातीर बंडू गोविंद | M.A I |
| ४ .शेटे रोहिणी सोपन | M.A II |

**विविध उपक्रम**

* **७ सप्टेंबर शिक्षक दिन** साजरा करण्यात आला, लक्ष्मी शिंदे, दीप्ती अंकुश लोंडे ,सुवर्णा माने या विद्यार्थींनी सहभाग घेतला .

* **१५ ऑक्टोबर 'वाचन प्रेरणा दिवस'** साजरा करण्यात आला यावेळी मा. प्राचार्य गंगाधर सातव यांनी भारत रत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या मधील इच्छाशक्ती व आत्मविश्वास असे विविध पैलू चरित्रातून उलगडून सांगितले . तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी "प्रकट वाचन केले" या कार्यक्रमाध्ये एकूण सहभागी विद्यार्थी ६२ इतके होते . या कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. बागुल एम.एम सूत्रसंचालन डॉ. शोभा तितर यांनी केले.

* **दि.१९/११/२०२२ बहि:शाल शिक्षण** व जेष्ठ नागरिक साय्यता कक्ष गाडगेबाबा व्याख्यानमला अंतर्गत मा. डॉ. शिवाजी पाचरणे यांचे " देहबोली व संवाद कौशल्ये" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते . त्यांनी संवाद कौशल्ये , माणसाच्या स्वभावानुसार देहबोली , भाषा ही संदेशवहनाचे कार्य करते. वाचन, लेखन व श्रवण कौशल्ये हे घटक आत्मसात केली पाहिजे असे असे मत व्यक्त केले. या व्याख्यानासाठी एकूण ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

*दि.१२/१२ /२०२२ रोजी माजी केंद्रीय कृषिमंत्री मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसा निमित्ताने पोस्टर्स प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये मराठी विभागातील कुं. चैत्राली खेडकर , कुं.श्रुतिका भोयने, सुवर्णा माने या एस.वाय.बी.ए वर्गातील विद्यार्थ्यांनी " मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी" या विषयावर पोस्टर्स प्रदर्शन केले .

**"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्स्फूर्तपणे साजरा"**

दिनांक-14 ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी विभागाने "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" या कार्यक्रमाच्या अंतर्गत "काव्यवाचन" व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते . महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सातव जी .पी यांच्या मार्गदर्शनाने दिनांक 21.01.2023 रोजी संपन्न झाली .या कार्यक्रमाच्या आपल्या मनोगत मध्ये मराठी भाषेची संवर्धन झाली पाहिजे, मराठीचा वापर दैनंदिन जीवनामध्ये केला पाहिजे ,तसेच संत साहित्य व पंतसाहित्य, शाहीर वाङ्मय यांचे मराठी भाषेमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य लेखन झाले ,असे विचार प्रतिपादन केले.

**काव्यवाचन स्पर्धेमध्ये प्रथम आलेली तीन विद्यार्थी**

*प्रथम क्रमांक -विघ्नेश जोशी -एम .ए मराठी .

*द्वितीय क्रमांक -सुरज शिराळे- एस वाय बी.सी. एस

*तृतीय क्रमांक -गीता कटारे -एफ .वाय. बी.सी एस

**निबंध लेखन स्पर्धेमध्ये प्रथम आलेली तीन विद्यार्थी**

| | |
|---|---|
| १) खेडेकर चैत्राली सुनील | S.Y.B.A |
| २)फाटक वैष्णवी विठ्ठल | F.Y.B.A |
| ३) माने वैष्णवी | S.Y.B.SC |

या स्पर्धेमध्ये एकूण 41 विद्यार्थीनी सहभाग घेतला होता .अशा पद्धतीने उत्स्फूर्त पणे विद्यार्थ्यांनी काव्य वाचनाचा आनंद लुटला .

***"२७ फेब्रुवारी, मराठी भाषा गौरव दिन"*( "लेखक आपल्या भेटीला" ज्येष्ठ लेखक व पत्रकार मा. महावीर जोंधळे)

२७ फेब्रुवारी वि. वा. शिरवाडकर उर्फ कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस"जागतिक मराठी भाषा दिन" म्हणून साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या मराठी विभागाने या निमित्त "लेखक आपल्या भेटीला" या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ लेखक व पत्रकार मा. महावीर जोंधळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. पी.सातव हे होते. मराठी विभाग प्रमुख डॉ. महादु बागुल यांनी प्रास्ताविक केले.प्रा.डॉ. शोभा तितर यांनी मा.महावीर जोंधळे यांची मुलाखत घेतली. आपल्या घडण्याचा प्रवास स्पष्ट करताना ," वि.वा.शिरवाडकर यांचा प्रत्यक्ष सहवास लाभला. इंदिरा संत, शांताबाई शेळके, ग. दि.माडगूळकर, विंदा करंदीकर, ग्रेस इ. मान्यवरांच्या सानिध्यात आल्यानंतर लेखक म्हणून घडणे शक्य झाले. मात्र त्यासाठी झपाटून जाणे हा स्वभाव झाला पाहिजे. संतांचा रोज एक अभंग समजून घेतला तर जगणे समृद्ध होते. शाहिरांनी धमण्यातली रग जिवंत ठेवण्याचे कार्य केले. बहिणाबाईंची कविता आयुष्याचा अर्थ सांगते. म्हणून नव्या पिढीने वाचनाकडे जाणीवपूर्वक वळले पाहिजे. आभासी जगात हरवून जाण्यापेक्षा स्वतःच्या अंतरंगात डोकवा. अर्थपूर्ण जगण्याचा ध्यास घ्या. " असे ते म्हणाले. आपल्या

सहजीवनाची हकीकत सांगताना महिन्याला पैसे नको , सोने नको, पण पुस्तके पाहिजेत असे सांगणारी जीवनसाथी मिळाली, असेही ते म्हणाले.मा. प्राचार्य डॉ. गंगाधर सातव यांनी "विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा लाभ घेतला पाहिजे, अधिकाधिक पुस्तके आणून ग्रंथालय समृद्ध करण्यावर भर दिला जाईल. मात्र चांगले वाचकही घडले पाहिजेत. "असे आपल्या अध्यक्षीय भाषणात स्पष्ट केले. सूरज शिराळे याने आपल्या कवितेचे सादरीकरण केले. श्रावणी कोंढेकर हिने नृत्यातून गणेश वंदना सादर केली.विघ्नेश जोशी यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाला आय क्यू ए सी समन्वयक डॉ. सपना राणे,डॉ. मेघना भोसले,डॉ. सुनीता डाकले ,व सर्व प्राध्यापक , विद्यार्थी यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी या दिवशी महाराष्ट्रीय पोशाख परिधान करून हा दिवस साजरा केला. या कार्यक्रमास एकूण ८७ विद्यार्थी उपस्थिती व महाविद्यालयतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

*दि. ९ मार्च २०२३ **'लेखन कौशल्य कार्यशाळा'**

"उत्कृष्ट मराठी लिहिणे, वाचणे, बोलणे सहजतेने घडावे. आज व्हॉट्सअ‍ॅप मराठीचा वापर वाढला असून मराठीतील चांगल्या साहित्याच्या वाचनापासून विद्यार्थीवर्ग दुरावत चालला आहे. विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचले पाहिजे, लिहिले पाहिजे." " वाट " या आपल्या कथेच्या पटकथेचे सादरीकरण करून एक ते दीड तास विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करणारे युवा पटकथाकार, सहायक दिग्दर्शक व अभिनेते गिरीश कोरवी " पटकथालेखन " या विषयावर मार्गदर्शन केले. मराठी अभ्यास मंडळ सदस्य डॉ. संदीप सांगळे यांनी " व्यावहारिक व उपयोजित मराठी लेखनकौशल्ये "या विषयावर मार्गदर्शन केले.

१.प्रा. डॉ. महादू मंगळीराम बागुल
२. प्रा.डॉ.शोभा तितीर

मराठी विभाग प्रमुख